# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२५

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### राज्यात आदर्श गाव विकास कार्यक्रम योजनेची अंमलबजावणी करणेबाबत

**(१) ८२३ (२४-०४-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनामार्फत ग्रामीण भागातील गावांच्या विकासासाठी आदर्श गाव योजना राबविण्यात येत असून या योजनेंतर्गत, ग्रामपंचायतींना विकासकामांसाठी निधी देण्याबाबत तसेच योजनेत सहभागी होणाऱ्या ग्रामपंचायतींना प्रशिक्षणासाठी सल्लागारांची नेमणूक केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत पाच वर्षात या योजनेंतर्गत राज्यातील कोणकोणत्या जिल्ह्यातील किती व कोणत्या गावांची निवड करण्यात आली आहे,

(३) असल्यास, या योजनेंतर्गत कोणत्या शासकीय योजना राबविल्या जात असून या योजनांच्या अंमलबजावणीबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (२०-०६-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

अंतिम निवड झालेल्या गावांच्या ग्रामस्तरीय समिती सदस्यांना ३ दिवसांचे प्रशिक्षण अहिल्यानगर जिल्ह्यातील यशवंतराव चव्हाण एकात्मिक ग्रामीण विकास प्रशिक्षण केंद्र, हिवरेबाजार आणि राळेगण सिध्दी येथील हिंद स्वराज ट्रस्ट या दोन प्रशिक्षण संस्था येथे दिले जाते.

(२) आदर्शगाव विकास योजनेंतर्गत गेल्या पाच वर्षात १७ जिल्ह्यातून ३५ गावांची निवड केलेली आहे. निवड करण्यात आलेल्या गावांची यादी सोबत जोडली आहे.

| अ.क्र | जिल्हा | तालुका | गाव |
|---|---|---|---|
| १. | रायगड | महाड | आढी |
| २. | रायगड | पेण | बळवली |
| ३. | रायगड | म्हसळा | मांदाटणे |
| ४. | रायगड | म्हसळा | लेप |
| ५. | पालघर | जव्हार | रायतळे |

| | | | |
|---|---|---|---|
| ६. | सिंधुदुर्ग | मालवण | गोळवण |
| ७. | नाशिक | नाशिक | लाडची |
| ८. | नाशिक | मालेगाव | खडकी |
| ९. | जळगाव | चाळीसगाव | जुनोनी |
| १०. | सोलापुर | बार्शी | चुंब |
| ११. | सोलापुर | माढा | परितेवाडी |
| १२. | कोल्हापुर | शाहुवाडी | ऐनवाडी-धनगरवाडी |
| १३. | सातारा | खटाव | सुर्याचीवाडी |
| १४. | लातुर | निलंगा | बोटकुळ |
| १५. | लातुर | चाकूर | हाळी खुर्द |
| १६. | लातुर | लातूर | माटेफळ |
| १७. | परभणी | मानवत | सावळी |
| १८. | परभणी | मानवत | इरळद |
| १९. | हिंगाली | शेनगाव | ताकतोडा |
| २०. | अमरावती | चिखलदरा | बारुगव्हाण-बुटीदा |
| २१. | अमरावती | चिखलदरा | मेहरीआम-कामिदा |
| २२. | बुलढाणा | सिंदखेडराजा | सवडद |
| २३. | बुलढाणा | देऊळगावराजा | मेंढगाव |
| २४. | बुलढाणा | देऊळगावराजा | दगडवाडी |
| २५. | बुलढाणा | सिंदखेडराजा | दरेगाव-नागझरी |
| २६. | बुलढाणा | सिंदखेडराजा | शिंधी |
| २७. | यवतमाळ | घाटंजी | रामपूर-शिरोली |
| २८. | यवतमाळ | वणी | नांदेपेरा |
| २९. | यवतमाळ | महागाव | बोरी-इजारा |
| ३०. | यवतमाळ | मारेगाव | वेगाव |
| ३१. | यवतमाळ | दारव्हा | पांढुर्णा |
| ३२. | यवतमाळ | आर्णि | कवठा बाजार |
| ३३. | नागपुर | उमरेड | मोहापा |
| ३४. | चंद्रपूर | वरोरा | बारव्हा |
| ३५. | वर्धा | हिंगणघाट | मुरपाड-मानोरा |

(३) आदर्शगाव विकास योजनेंतर्गत राज्यात मागील ५ वर्षांत ३५ गावे निवडलेली आहेत.

३५ गावांपैकी २७ गावांचे सविस्तर प्रकल्प आराखडे मंजूर झाले असून, सदर गावांमध्ये पाणलोट विकास कामे (गाभा कामे), मत्ताहीन लोकांसाठी व बचत गटांचे उद्योगास सहाय्य, गाव विकास कामे (बिगर गाभा कामे) इत्यादी कामे सुरू आहेत.

३५ गावांपैकी उर्वरीत ८ गावांमध्ये सविस्तर प्रकल्प आराखडे तयार करणे, प्रेरक प्रवेश उपक्रम,

ग्रामस्तरीय प्रशिक्षण इत्यादी कामे सुरू आहेत. तसेच आदर्शगाव योजनेत निवड झालेल्या गावांमध्ये लोकप्रतिनिधी मार्फत उपलब्ध होणाऱ्या स्थानिक विकास निधीतून व शासनाच्या विविध विभागाच्या ग्रामस्तरावरील वेगवेगळ्या योजनेंतर्गत अभिसरणातून उपलब्ध होणाऱ्या निधीतून योजनेच्या अंमलबजावणी व गाव विकास कामांसाठी निधी वापरला जातो.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाबळेश्वर (ता.वाई, जि.सातारा) येथील पंचतारांकित हॉटेल मधील कामगारांच्या मागण्यांबाबत

**(२) ११०८ (२४-०४-२०२५) श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्राचे मिनी काश्मीर असलेल्या महाबळेश्वर या पर्यटन स्थळावरील पंचतारांकित हॉटेल ब्रहमा कॉर्पोरेशन लि-मेरिडियन मधील कामगारांनी विविध मागण्यांसाठी काम बंद आंदोलन सुरु केले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामगारांच्या मागण्यांचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे, तसेच कामगारांच्या मागण्यां पूर्ण करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (०४-०६-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मे.लि-मेरिडियन हॉटेल ॲण्ड स्पा महाबळेश्वर, जि.सातारा या हॉटेल व्यवस्थापनाने हॉटेलमधील कामापासून वंचित असलेल्या ०६ स्थानिक भुमिपूत्र कामगारांना कामावर पुन्हा रुजू करुन घ्यावे, अशी तक्रार राष्ट्रवादी महाराष्ट्र जनरल कामगार युनियनने दाखल केलेली होती. त्यास अनुसरून दिनांक १५/०१/२०२५ व दिनांक १६/०१/२०२५ रोजी उभयपक्षांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

तथापि, सदर बैठकीस व्यवस्थापन गैरहजर असल्याने चर्चा होऊ शकली नाही. तद्नंतर, दिनांक २०/०१/२०२५ रोजी आंदोलनाच्या दिवशी संघटना व व्यवस्थापन यांचे समक्ष चर्चेव्दारे यशस्वी तोडगा काढण्यात आला आहे व ०६ स्थानिक भुमिपूत्र कामगारांना कामावर रुजू करुन घेण्यात आल्याने, सदरचे काम बंद आंदोलन मागे घेण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## आंधलगाव शाखा (ता.मोहाडी, जि.भंडारा) येथील मुख्य पाटबंधारा व छोट्या बंधाऱ्यांच्या तटांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३) १२६६ (१३-०२-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंधलगाव शाखा (ता.मोहाडी, जि.भंडारा) ह्या मुख्य पाटबंधाऱ्यास ६ सब बंधारे जोडले असून याद्वारे शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणीपुरवठा केला असून आंधलगाव शाखेच्या मुख्य पाटबंधारा व छोट्या

बंधाऱ्यांचे तट तुटल्याने शेतकऱ्यांना शेतीकरीता पुरेसे पाणी सिंचनासाठी मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तट तुटल्याने पाणी गळती होऊन ते इतर परिसरात जात असून सिंचनाकरीता वेळेवर पाणी उपलब्ध होत नाही व त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शेतकऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रार करूनही याकडे दुर्लक्ष केले जात असून मुख्य पाटबंधारा व छोट्या बंधारांच्या तटांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड (१२-०३-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

आंधळगांव शाखा मुख्य पाटबंधाऱ्यास ६ सब बंधारे जोडले नसून ४ सब बंधारे जोडले आहेत. त्यापैकी आंधळगांव येथील नाल्यावर सन २००३-०४ मध्ये को.प. बंधारा बांधण्यात आला होता. तथापि, सदर बंधारा सन ऑगस्ट, २०२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त (Out Flanking) झालेला आहे. व ३ बंधारे सुस्थितीत आहेत.
(२) हे खरे नाही.

सदर बंधारा क्षतीग्रस्त (Out Flanking) झालेला असून बंधाऱ्याची तात्पुरती दुरुस्ती केल्याने बंधाऱ्यामध्ये पाणी साठवून राहिल्यामुळे त्याचा शेतकऱ्यांना सिंचनासाठी होतो.
(३) अतिवृष्टीमुळे क्षतीग्रस्त झालेला बंधारा दुरुस्तीकरीता जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे दिनांक ७/०९/२०२२ रोजी निधीची मागणी करण्यात आलेली आहे. जिल्हा वार्षिक योजनेच्या नियोजनात सुध्दा समावेश करण्यात आला होता परंतू पुरेशा निधी अभावी जिल्हा परिषदेचे जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीने सदर कामांचा सन २०२४-२५ चे नियोजनात समावेश केलेला नाही.
(४) निधी उपलब्ध न झाल्याने कायमस्वरुपी दुरुस्तीचे काम करता आलेले नाही. निधी उपलब्ध होताच काम करण्यात येईल.

---

## बारव्हा (ता.लाखांदूर, जि.भंडारा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे महिलेचा मृत्यू झाल्याबाबत

**(४) १२७५ (२५-०२-२०२५) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बारव्हा (ता.लाखांदूर,जि.भंडारा) प्राथमिक आरोग्य केंद्र येथील डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे २४ वर्षीय श्रीमती मेघा बनारसे या महिलेचा कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया अयशस्वी झाल्यामुळे मृत्यू झाल्याची घटना माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यासुमारास घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मृत महिलेच्या नातेवाईक व नागरिकांनी दोषींविरुध्द कारवाई करण्यासाठी व मृत महिलेच्या नातेवाईकांना नुकसान भरपाई देण्यासाठी आंदोलन केल्यानंतर घटनेस जबाबदार असलेल्या दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निलंबनाचा प्रस्ताव मंत्रालय, मुंबई येथे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे

आहे काय,
(३) असल्यास, सदर घटनेसंदर्भात केवळ निलंबनाच्या प्रस्ताव सादर झाला असून मृत महिलेच्या नातेवाईकास अद्याप कोणतीही आर्थिक नुकसान भरपाई मिळाली नसल्याने ती तातडीने देण्यासंदर्भात तसेच संबंधित दोषींविरुध्द नियमानुसार कठोर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रकाश आबिटकर (१२-०३-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) ग्राम विरली तथा प्राथमिक आरोग्य केंद्र सरांडी दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्याने संबंधित एका वैद्यकीय अधिकाऱ्याचे निलंबन करण्यात आले असून प्रकरणाशी संबंधित दुसऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यास सक्तीच्या रजेवर पाठविण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) रुग्ण कल्याण समिती, जिल्हा रुग्णालय, भंडारा व ग्रामीण रुग्णालय, लाखांदूर यांचेमार्फत रुपये २,५०,०००/- (रुपये १,२५,०००/- + रुपये १,२५,०००/-) दिनांक २०/०१/२०२५ रोजी मयत महिलेचे पती श्री.आकाश बनारसे यांच्या खात्यात RTGS & PFMS द्वारा अदा करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पूर्व प्राथमिक म्हणजे प्ले स्कूल-नर्सरीच्या नोंदीबाबत

**(५) १४४८ (२४-०२-२०२५) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे : तारांकित प्रश्न क्रमांक १९२०३ ला दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मोठ्या प्रमाणात पूर्व प्राथमिक म्हणजे प्ले स्कूल-नर्सरी चालविल्या जात असून त्यांची नोंदणी होत नसल्याने ही नोंदणी शालेय शिक्षण विभागाकडे करणे अनिवार्य असेल असे निर्देश मा.मुख्यमंत्र्यांनी शालेय शिक्षण विभागाला माहे जानेवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ मध्ये पूर्व प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांचा समावेश करण्यात आलेला नाही, तथापि, केंद्र शासनाच्या नवीन शिक्षण धोरण-२०२० अंतर्गत पूर्व प्राथमिक शिक्षणाचे नियमन करण्याची बाब प्रस्तावित केली असे नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार पूर्व प्राथमिक म्हणजे प्ले स्कूल-नर्सरीच्या बालकाची शासकीय नोंद वहीत नोंद घेण्याबाबत अथवा प्ले स्कूल-नर्सरीला मान्यता देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१३-०३-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) पूर्व प्राथमिक शिक्षण विनियमन आराखडा शासनास प्राप्त झालेला असून, पूर्व बाल्यावस्थेअंतर्गत

संगोपन व शिक्षण कायदा व नियमावली बनविण्याचे काम शासनस्तरावर सुरु आहे. तसेच पूर्व प्राथमिक संस्थांच्या नोंदणीसाठी NIC च्या मदतीने पोर्टल विकसनाचे काम सुरु आहे.
(४) प्रश्न उदभवत नाही.

.

---

## क्रीडा संकुलाच्या निधीमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(६) १५३७ (२०-०२-२०२५) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या क्रीडा विभागाच्या क्रीडा संकुलासाठी रुपये १०४ कोटींचा निधी मंजूर करण्यात आलेला असताना राज्य विकास समितीने क्रीडा धोरणाचे उल्लंघन करुन रुपये १७०० कोटी रुपयांच्या क्रीडा संकुलांच्या कामांना मंजुरी देण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आलेल्या निधीपेक्षा जास्तीचा निधी खर्च करण्यासाठी वित्त विभागाकडून मान्यता देण्यात आली नसतानाही दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ रोजी क्रीडा विभागाकडून शासन निर्णय काढून नियमबाह्य पध्दतीने क्रीडा संकुलांच्या कामांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने क्रीडा संकुलांच्या प्रस्तावाबाबत वाढीव निधीची तरतुद नसतानाही शासनाच्या निधीमध्ये करण्यात आलेल्या अनियमिततेबाबत सर्व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे (०५-०३-२०२५) :** (१), (२), (३) व (४) राज्य क्रीडा विकास समितीला क्रीडा संकुलांच्या अंदाजपत्रास प्रशासकीय व वित्तीय मंजूरीचे अधिकार आहेत. तथापि, यापूर्वी काही क्रीडा संकुलाच्या प्रस्तावांना तेथील टाइप प्लॅन व्यतिरिक्तच्या क्रीडा सुविधांसाठी राज्य क्रीडा विकास समितीने विहित धोरण व अनुदान मर्यादाबाहेर मंजूरी दिली आहे. अशा प्रस्तावांच्या प्रकरणी नियोजन व वित्त विभागाच्या सहमती घेऊन मंत्रिमंडळाने दिनांक २३/०९/२०२४ रोजीच्या बैठकीत कार्योत्तर मान्यता दिली आहे. त्यानुसार याबाबत शासन निर्णय दिनांक २७/०९/२०२४ निर्गमित केला आहे. तसेच या आर्थिक वर्षात दिनांक ७/०८/२०२४ रोजी झालेल्या राज्य क्रीडा विकास समितीच्या बैठकीत १४ संकुलांच्या अंदाजपत्रकांना विहित अनुदान मर्यादेत मान्यता दिली आहे.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांसह खासगी अनुदानित शाळांत पोषण आहार पुरविणाऱ्या बचतगटांना निधी देण्याबाबत

**(७) १७२६ (२४-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या निर्देशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांसह खाजगी अनुदानित शाळांत शालेय पोषण आहार पुरविण्याचे काम देण्यात आलेल्या बचतगटांना पोषण आहाराच्या निधीसाठी तीन ते चार महिन्यांची प्रतीक्षा करावी लागत असल्याची बाब दिनांक ३० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि मुंबई महानगरपालिकेच्या शाळांसह खाजगी अनुदानित शाळांत शालेय पोषण आहार पुरविण्याचे काम देण्यात आलेल्या बचतगटांना पोषण आहाराचा निधी वेळेत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०६-०६-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील योजनेस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना १४७ बचतगट / संस्थांमार्फत पोषण आहाराचा लाभ देण्यात येत आहे. योजनेंतर्गत MDM पोर्टलवर नोंदविलेल्या लाभार्थी संख्येनुसार ऑनलाईन पध्दतीने देयके तयार करुन बचतगटांना विहित कालावधीत अदा करण्यात येतात. तथापि, सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये केंद्र शासनाकडून दुसऱ्या हप्त्याचा निधी विहित वेळेत प्राप्त न झाल्यामुळे माहे ऑगस्ट ते डिसेंबर, २०२४ या कालावधीतील देयके माहे जानेवारी, २०२५ मध्ये अदा करण्यात आली आहेत. सद्य:स्थितीत माहे फेब्रुवारी, २०२५ पर्यंतची देयके अदा करण्यात आलेली आहेत. तसेच, माहे एप्रिल, २०२५ पर्यंतची देयके अदा करण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रामटेकडी, हडपसर, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(८) २०४३ (१७-०४-२०२५) श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेकडी, हडपसर, (जि.पुणे) येथील सर्व्हे नंबर.११०, हि.क्र.२/३ व ९क हा झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प प्राधिकरणाच्या अनेक नियमावलींचे व शासन निर्णयाचे जाणिवपूर्वक उल्लंघन करीत मागील नऊ वर्ष प्रलंबित असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी अकार्यक्षम असणाऱ्या खाजगी बांधकाम व्यावसायिक यांचा बांधकाम परवाना रद्द करुन त्यांचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करुन सदर प्रकल्पाचे तातडीने पुनर्वसन करण्याची मागणी तेथील झोपडपट्टीधारकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर नऊ वर्षे प्रलंबित असलेल्या हडपसर-रामटेकडी सर्वे नंबर ११० येथील निवासी प्रकल्प तातडीने उभारण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०६-२०२५) :** (१), (२) व (३) रामटेकडी, हडपसर, पुणे येथील स.नं.११० अ/१, हिस्सा क्र. २अ, 3ब/२, ५, ६ब/७ब, ८ब +८क, ९क मधील मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा प्रस्ताव विकासकाने दि. २१/०७/२०१४ रोजी सादर केला आहे. सदर योजनेच्या अनुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र निर्धारित करणे बाबत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ३(क) अंतर्गत दि.१०/०२/२०१४ रोजी आदेश पारित करण्यात आले आहेत. तसेच कलम ३(ड) व कलम १२ अतंर्गत दि. ०३/०१/२०१७ रोजी झोपडपट्टी निर्मुलन आदेश पारित करण्यात आला आहे. परंतु अद्याप जागेवर निष्कासन झाले नाही.

मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांनी सदर प्रकरणी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने विकासकाकडून खुलासा मागविला आहे. तसेच, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम १३(२) नुसार विकासकाविरूध्द कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

## धाराशिव जिल्यातील खाजगी सावकारांकडून शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावण्यात आल्याबाबत

**(९) २०४८ (२४-०२-२०२५) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव जिल्ह्यातील खाजगी सावकारांकडून आर्थिक अडचणीत सापडलेल्या १७० शेतकऱ्यांच्या शेतजमिनी बळकाविण्यात आल्याच्या तक्रारी उपनिबंधकांकडे करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी सावकार शेतकऱ्यांना कर्ज देण्यासाठी त्यांच्या जमिनी नावावर करुन घेत असून शेतकऱ्यांनी कर्जाची परतफेड करुनही संबंधित सावकार जमिनी परत करित नसल्याच्या तक्रारी जिल्हा उपनिबंधकांकडे करण्यात आल्या असून अकरा महिन्यांपेक्षाही जास्तीचा कालावधी होवूनही कोणतीही कारवाई खाजगी सावकारांवर करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धाराशिव जिल्ह्यात असलेल्या परवानाधारक खाजगी सावकारांकडे असलेल्या परवान्याचे नुतनीकरण सुध्दा करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तदनुषंगाने शासनाने धाराशिव जिल्ह्यातील उपनिबंधकाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने किती खाजगी सावकारांवर कारवाई करुन शेतकऱ्यांच्या जमिनी परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाबासाहेब पाटील (११-०३-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ हा अस्तित्वात आल्यापासून माहे जानेवारी २०२५ पर्यंत अधिनियमाच्या कलम १८ नुसार धाराशिव जिल्ह्यातील २७५ तक्रार अर्ज जिल्हा उपनिबंधक, धाराशिव कार्यालयाकडे प्राप्त झाले आहेत.

(२) हे खरे नाही.

धाराशिव जिल्ह्यातील प्राप्त २७५ तक्रार अर्जांपैकी माहे जानेवारी २०२५ अखेर १३१ तक्रार अर्जावर चौकशीची कार्यवाही व सुनावणी पूर्ण करुन अर्ज निकाली काढण्यात आले आहेत. सदर १३१ अर्जदार शेतकऱ्यांना सावकाराच्या ताब्यातील ९७.०९ हेक्टर जमीन परत करण्यात आली आहे. तसेच १३१ प्रकरणांपैकी ५५ प्रकरणी सावकारांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे. उर्वरित १४४ तक्रारींवर महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम १८ (२) मधील तरतुदीनुसार सुनावणीची प्रक्रीया चालू असून या प्रकरणी गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यात येईल.

(३) हे खरे नाही.

धाराशिव जिल्ह्यात सन २०२३-२४ मध्ये एकूण १६२ परवाना धारक सावकार होते. यापैकी सन २०२४-२५ मध्ये १३० सावकारी परवान्याचे नुतनीकरण करण्यात आले आहे. संबंधित सहायक निबंधक, सहकारी संस्था यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार उर्वरीत ३२ प्रकरणी सावकारी परवाने रद्द करण्यात आले आहेत.

(४) धाराशिव जिल्ह्यातील सहकार आयुक्त कार्यालयाकडे प्राप्त २७५ तक्रार अर्जांपैकी माहे जानेवारी २०२५ अखेर १३१ तक्रार अर्जांवर चौकशीची कार्यवाही व सुनावणी पूर्ण करुन अर्ज निकाली काढण्यात आलेले आहेत. सदर १३१ अर्जदार शेतकऱ्यांना सावकाराच्या ताब्यातील ९७.०९ हेक्टर जमिनी परत करण्यात आल्या आहेत. या १३१ प्रकरणांपैकी ५५ प्रकरणी सावकारांवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांचे डिजिटलायझेशन करण्याबाबत

**(१०) १५४४३ (२८-१२-२०२२) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या २५० शाळांचे डिजिटलायझेशन करण्याचा प्रस्ताव मागील दोन वर्षांपासून शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावाला मान्यता देऊन नागपूर जिल्ह्यात १००% डिजिटल शाळांचे ध्येय गाठण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयकुमार गोरे (२९-०५-२०२५) :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.

जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत जिल्हा परिषद शाळांमध्ये डिजीटल स्मार्ट क्लासरुम, डिजीटल वर्गखोली इत्यादी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शैक्षणिक साहित्य स्विस चॅलेंज पध्दतीने खरेदी करण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडून दिनांक १७/०७/२०१९ रोजी ग्रामविकास विभागाकडे सादर करण्यात आला. सदर प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग- माहिती तंत्रज्ञान विभागाच्या उच्चाधिकार समितीकडून दिनांक १४/०२/२०२० रोजी झालेला बैठकीत नांमजुर करण्यात आला. तद्नंतर जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडून दिनांक २६/०७/२०२२ चे पत्रान्वये मा.जिल्हाधिकारी यांना ओपन टेन्डर करण्याकरीता अनुमती मागण्यात आली असता दिनांक २८/१२/२०२२ पर्यंत मंजुरी प्राप्त झाली नाही. सदर योजनेसाठीचा निधी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना अंतर्गत जिल्हा खनिज प्रतिष्ठान, विनिमय परिषद, नागपूर यांचेकडून प्राप्त झाला

असल्याने खनिज प्रतिष्ठान, नागपूर यांनी सदर अखर्चित निधी परत करण्याबाबत दिनांक ०८/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिले. त्यामुळे सदर योजनेचा अखर्चित निधी परत करण्यात आलेला आहे. सबब सदर योजनेचे उद्दिष्ट साध्य करता आलेले नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाड्याच्या दुष्काळग्रस्त भागातील स्थलांतरित कामगारांच्या शोषणाबाबत उपाययोजनांसाठी समिती स्थापन करण्याबाबत

**(११) २०२१० (०८-०८-२०२३) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मराठवाडा विभागातील दुष्काळग्रस्त भागातील कामगार विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर, पुणे, सातारा, सोलापूर इ. जिल्ह्यात स्थलांतर करित असून सदर कामगारांच्या शोषणाच्या घटनां घडत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीड, धाराशिव, जालना, लातूर, नांदेड आणि परभणी जिल्ह्यांतील ५०० गावांपैकी सुमारे ७० टक्के गावे ही दर हिवाळयात कामगारांच्या स्थलांतरामुळे रिकामी होतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठवाड्याच्या दुष्काळग्रस्त भागातील स्थलांतरित कामगारांच्या शोषणाबाबतच्या उपाययोजनांसाठी शासनामार्फत समिती स्थापन करण्यात आली आहे काय, असल्यास, सदर समितीने अहवाल शासनास सादर केला आहे काय, सदर अहवालातील शिफारशीचे स्वरुप काय आहे,
(४) असल्यास, सदर अहवालातील शिफारशींची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागातील स्थलांतरित कामगारांच्या शोषणाबाबत शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर (१८-०६-२०२५) :** (१) नाही.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.
या भागातील उसतोड कामगार प्रामुख्याने गळीत हंगामात स्थलांतर करतात.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) स्थलांतरीत वेठबिगारांच्या तक्रारी हाताळण्याकरीता वेठबिगार कामगार (निर्मूलन) अधिनियम १९७६ अन्वये जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा वैद्यकीय महाविद्यालयाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१२) २११६३ (०५-०१-२०२४) श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा वैद्यकीय महाविद्यालयाचे (जि.सातारा) तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या इमारतीचे बांधकाम अतिशय संथ गतीने सुरु असून कोट्यवधी रुपयांची देयके थकीत असल्यामुळे बांधकामास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, कामाची प्रगती व सद्य:स्थिती काय असून या कामावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आलेला आहे व आणखी किती खर्च अपेक्षित आहे,
(३) असल्यास सदर वैद्यकीय महाविद्यालयाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१८-०६-२०२५) :** (१) नाही
(२) सातारा शहरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथील टप्पा-१ इमारतींचे बांधकाम प्रगतीपथावर असून रुपये ४७४.०८ कोटी इतका खर्च झालेला असून रुपये १७ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.
(३) टप्पा-१ येथील बांधकाम अंतिम टप्प्यात आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

## नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात इंटर्नशिप करणाऱ्या डॉक्टरांच्या निवासाचा प्रश्न निर्माण झाल्याबाबत

**(१३) २१५९३ (०५-०१-२०२४) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाने दोन वसतीगृहाची इमारत पाडण्याचा निर्णय घेतल्याने शेकडो इंटर्नशिप करणाऱ्या डॉक्टरांच्या निवासाचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून या डॉक्टरांना सात दिवसाच्या आत वसतीगृह सोडण्यास सांगण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास इंटर्नशिप करणाऱ्या डॉक्टरांना २४ तास ड्यूटी करावी लागत असल्याने पुणे, मुंबईच्या धर्तीवर इंटर्नशिप करणाऱ्या डॉक्टरांना या वसतीगृहात निवासाची सोय करण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१८-०६-२०२५) :** (१) नाही
(२) इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील दोन वसतिगृहे रिक्त करताना तिगृहामध्ये राहणाऱ्या विद्यार्थ्यांना नवीन मुलांचे वसतिगृह व जुने मुलींचे वसतिगृहामध्ये तसेच नर्सिंग वसतिगृहातील रिक्त खोल्यांमध्ये इंटर्न मुलींची राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विजाभज आश्रमशाळेतील शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन दरमाह १ तारखेला मिळण्याबाबत

**(१४) २२१६३ (०४-०१-२०२४) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विजाभज आश्रमशाळेमधील शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या १ तारखेस करण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक १६ मे २०१८ निर्गमित केले असतानाही आश्रमशाळा शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन कधीच १ दिनांकास होत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इतर मागास बहुजन कल्याण विभाग अंतर्गत संचालित राज्यातील अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा मधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन दोन-तीन महिन्यांपासून प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आश्रमशाळेमधील शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या १ तारखेस करण्याबाबत शासन परिपत्रक निर्गमित केले असताना वेतन १ तारखेस होत नाही, याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, इतर मागास व बहुजन कल्याण विभागाच्या अनुदानित आश्रमशाळांकरीता नियमित वेतन तरतूद उपलब्ध करून द्यावी तसेच उणे प्राधिकारातून देयके मंजुरीची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (०४-०६-२०२५) :** (१) होय, खरे आहे.

(२), (३) विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित निवासी आश्रमशाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी वित्त विभागाकडून शासन परिपत्रक, दिनांक ०४/०४/२०२४ मधील निधी वितरणाचे सूत्र अवलंबविण्यात येत आहे. तथापि, विभागामार्फत दरमहा कर्मचाऱ्यांच्या वेतनापोटी क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त निधी परिगणनेनुसार वित्त विभागाने उपलब्ध/वितरीत केलेला निधी स्वतंत्र लेखाशिर्षाखाली कर्मचाऱ्यांच्या वेतनाकरीता संचालक, पुणे यांचेमार्फत सहाय्यक संचालकांना उपलब्ध करून देण्यात येत असून कर्मचाऱ्यांचे वेतन रखडलेले अथवा थकलेले नाही.

(४) विजाभज प्रवर्गाच्या आश्रमशाळांमधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी वित्त विभागाकडून निधी प्राप्त झालेवर तात्काळ वितरीत करण्यात येतो. शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक अर्थस-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दिनांक ०४ मे, २०२० नुसार "उणे प्राधिकरण खर्च करण्यास प्रतिबंध" यात कोणत्याही विभागास कोणताही खर्च वित्त विभागाच्या पुर्वानुमानाशिवाय उणे प्राधिकारात करता येणार नाही, असे नमूद केलेले असल्याने अशा प्रकारे कार्यवाही करता येत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे उभरण्याबाबत

**(१५) २२८७३ (१८-०५-२०२४) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ३६ जिल्ह्यांमध्ये इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत ओबीसी विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी दोन वसतीगृहे उभारण्याबाबत योजना राबविण्यात येणार असल्याची बाब माहे मार्च,२०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसतीगृहे उभारण्याकरीता जागा मिळवून त्यावर कायमस्वरुपी इमारत उभारण्याकरीता किती कालावधी लागणार आहे तसेच सद्य:स्थितीत भाडेतत्त्वावर वसतीगृहे घेण्याचा निर्णय शासनाने घेतला असून सदर निर्णयाच्या अंमलबजावणीकरीता निधीची तरतूद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी ३६ जिल्ह्यांमध्ये ओबीसी विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी दोन वसतीगृहे भाडेतत्त्वावर घेण्याच्या निर्णयाबाबत किंवा कायमस्वरुपी वसतीगृहे उभारण्याबाबत अद्यापही अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (२७-०५-२०२५) :** (१), (२) व (३) जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने स्वत: इमारत भाड्याने घेवून जिल्हानिहाय वसतिगृहे कार्यान्वित करण्याचा निर्णय दिनांक २८/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

तसेच, विभागाच्या कायमस्वरुपी वसतिगृहाकरीता केंद्र शासनाच्या बाबू जगजीवनराम छात्र आवास योजनेतून मिळणाऱ्या अर्थसहाय्यातून राज्यातील इतर मागासवर्गातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी १८ व मुलींसाठी १८ असे एकूण ३६ वसतिगृहे जिल्ह्याच्या ठिकाणी सुरू करण्याबाबत दिनांक ३०/०१/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेंतर्गत जमीन प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही क्षेत्रियस्तरावर सुरु आहे.

तथापि, सद्य:स्थितीत विविध जिल्ह्यात इमारती भाडे पट्टीने घेऊन ५४ वसतिगृहे कार्यान्वित करण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे ते नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्गावर संगमनेर शहराजवळ इंटरचेंज करण्याबाबत

**(१६) २२९७५ (२२-०७-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे ते नाशिक दरम्यान २१३ किलोमीटर लांबीच्या औद्योगिक द्रुतगती महामार्गासाठी अधिसूचना जारी करून भूसंपादन प्रक्रिया सुरू केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संगमनेर शहरातून हजारो नागरिक विद्यार्थी दररोज पुणे व नाशिककडे प्रवास करित असल्याने सदर महामार्गाच्या प्रस्तावित रेखांकनात महामार्गावर संगमनेर शहराजवळ इंटरचेंज प्रस्तावित करण्यात यावा अशी मागणी प्रस्तुत प्रतिनिधी यांनी माननीय मुख्यमंत्री यांच्याकडे माहे मार्च, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०१-०४-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर कामाच्या प्रकल्प अहवालात संगमनेर शहरासाठी इंटरचेंज प्रस्तावित केलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील केळी फळपीक विमापासून वंचित शेतकरी यांना फळपीक विमा लाभ देणेबाबत

**(१७) २३७११ (१८-०७-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यात हवामानावर आधारित केळी फळपीक विमा योजनेच्या कृषी आयुक्तांकडे शिफारस केलेल्या १० हजार शेतकऱ्यांपैकी ६,६८६ शेतकऱ्यांना अद्याप विम्याचा लाभ दिला नसल्याने लाभार्थी शेतकरी विम्यापासून वंचित आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी केळी फळपीक विमायोजनेचा सरसकट लाभ देणेकरीता काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**अ‍ॅड. माणिकराव कोकाटे (०८-०५-२०२५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) केळी पिकाचे विमा संरक्षित क्षेत्र मोठे असल्याने व १०० टक्के क्षेत्र तपासणी न झाल्याने, ३१८८६ प्रलंबित अर्जासंदर्भात केंद्र शासनाने दिनांक २७/०९/२०२३ रोजीच्या बैठकीत दिलेल्या निदेशानुसार M.R.S.A.C. मार्फत उपग्रहचित्रांद्वारे सर्वे नंबरनिहाय केळी पिकाखालील क्षेत्र मोजण्यात आले. जिल्हाधिकारी जळगाव यांनी केळी पिकाच्या विम्याच्या लाभासाठी पाठविलेल्या ६,६८६ शेतकऱ्यांच्या यादीबाबत भारतीय कृषी विमा कंपनी यांचेकडून अहवाल घेतला असता, जळगाव जिल्ह्यातील ६,६८६ शेतकऱ्यांच्या यादीतील ६,६०९ शेतकऱ्यांचे विमा प्रस्ताव महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर (M.R.S.A.C.) यांच्या अहवालात विमा संरक्षित गट क्रमांकावर केळी पीक क्षेत्र आढळून आले नसल्याने रद्द करण्यात आलेले आहेत. तसेच ४७ विमा प्रस्तावांच्या केळी पीकाखालील क्षेत्र विमा संरक्षित क्षेत्रापेक्षा कमी नमूद केलेले असल्याने संबंधित गट क्रमांकाच्या विमा प्रस्तावाचे N.C.I.P. पोर्टल वर विमा संरक्षित क्षेत्र त्या प्रमाणात कमी करून विमा प्रस्ताव स्वीकृत करुन विमा नुकसान भरपाई संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये वर्ग करण्यात आलेली आहे व २९ शेतकऱ्यांचे विमा प्रस्ताव विमा संरक्षित गट व क्रमांकावर केळी पीक क्षेत्र आढळून आले असल्याने मंजूर करण्यात आलेले असून पात्र नुकसान भरपाई संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शेख असगर शेख अकबर (ता..मुक्ताईनगर, जि.जळगाव) यांच्या संशयास्पद मृत्यूची सीआयडी चौकशी करणेबाबत

**(१८) २३७३६ (२२-०७-२०२४) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुऱ्हा रोड (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील वलारखेडा गावाजवळ रहिवासी शेख असगर शेख अकबर यांचा दिनांक २ मार्च, २०२४ रोजी अपघातात मृत्यू झाला असून बहुजन मुक्ती मोर्चा, मणियार बिरादरी संघटना, मुक्ताईनगर यांनी सदर मृत्यूबाबत घातपाताचा संशय व्यक्त करुन सीआयडी चौकशी करण्याबाबतची मागणी केलेली असून याबाबत दिनांक ०२ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिलेले आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने सदरील तपास सीआयडीकडे वर्ग करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२१-०४-२०२५) : (१)** होय, हे खरे आहे.

**(२)** सदर घटनेच्या अनुषंगाने प्रथम मुक्ताईनगर पोलीस स्टेशन येथे अकस्मात मृत्यू.रजि.क्र. २४/२०२४ क्रि.प्रो.को.कलम. १७४ नुसार दाखल करण्यात आला होता. तद्नंतर, सदर अकस्मात मृत्यूचे तपासात मयत यास कोणीतरी अज्ञात वाहन चालक याने धडक मारुन अपघातात मयत झाल्याचे निष्पन्न झाल्याने मुक्ताइनगर पोलीस ठाणे, जळगाव गु.र.नं. २३५/२०२४ अन्वये भा.दं.वि.कलम.३०४(अ), २७९, ३३८, मो.वा.का.कलम. १८४, १३४(ब) प्रमाणे दिनांक २७/०६/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील आरोपी अज्ञात वाहन चालकाचा शोध घेण्यात येत असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

**(३)** विलंब झालेला नाही.

---

## औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील जलजीवन मिशन योजनेंतर्गत आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१९) २३७४९ (२०-०७-२०२४) डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यात अनेक गावांत शासनाने जलजीवन मिशन योजनेंतर्गत लाखो रुपये खर्च केले असूनही सदर योजना सुरु न झाल्यामुळे अनेक गावातील नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून सदर नळ योजना तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (१२-०६-२०२५) : (**१) व (२) हे अंशत: खरे आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील ११७ गावांसाठी ११४ नळ पाणीपुरवठा योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येत असून ८१ गावांमध्ये या योजनांमधुन पाणीपुरवठा सुरु आहे. त्यापैकी ३६ कामे भौतिकदृष्टया पूर्ण करण्यात आली असून उर्वरीत गावांमध्ये जल जीवन मिशन अंतर्गत कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच, औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील जवळा बाजार व शिरड शहापूर या दोन गावांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत संयुक्त पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेतून सदर गावांमध्ये अस्तित्वातील उपांगांचा वापर करुन पाणीपुरवठा करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच काही गावांमध्ये पाणी पातळी कमी झाल्याकारणाने विंधन/ विहीर अधिग्रहण करुन टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु आहे.

जल जीवन मिशन अंतर्गत योजनांची कामे प्रगतीपथावर असून राज्य स्तरावर व जिल्हा स्तरावर नियमित आढावा घेण्यात येत असून कामे वेळेत पूर्ण करण्याबाबत संबंधितांना सुचना देण्यात येत आहेत.

तसेच नियमित पाणीपुरवठा सुरु करण्याच्या दृष्टीने अपूर्ण असलेल्या नळ पाणीपुरवठा योजनांच्या कामांसंदर्भात संबंधित कंत्राटदारांना नोटीसा देऊन आवश्यक तो पाठपुरावा करण्यात येत आहे. याप्रकरणी ३२ कंत्राटदारांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांच्यामार्फत दंड लावण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पवनी (जि.भंडारा) येथील एमआयडीसीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२०) २४०८४ (२०-०७-२०२४) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवनी (जि.भंडारा) तालुक्यातील एमआयडीसीत कोणत्याही सुविधा नसल्याने येथील बेरोजगारांचे कामासाठी इतरत्र स्थलांतर होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर एमआयडीसीला तात्काळ सर्व सुविधा देऊन बेरोजगारांचे होणारे स्थलांतर थांबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(३) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री.उदय सामंत (२०-०६-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) पवनी (जि.भंडारा) येथे म.औ.वि. महामंडळाद्वारे १०.१५ हेक्टर जागेवर पवनी लघु औ. क्षेत्र विकसित करण्यात आले आहे. या औद्योगिक क्षेत्रात १५ भुखंड आरेखित करण्यात आले असून एक भुखंड आंवटीत करण्यात आला आहे. सदर औद्योगिक क्षेत्रात मूलभूत सुविधे अंतर्गत रस्ते व विजपुरवठा वाहिनी इत्यादी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.

सदर औद्योगिक क्षेत्रातील भुखंड क्र. बी-२ १५७६० चौ.मी. क्षेत्रावर भंडारा जिल्हा राईस क्लस्टरचे नकाशे मंजूर करण्यात आले असून सद्य स्थितीत भुखंडावर बांधकाम सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.